# महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.पुणे.

५,बी.जे.रोड,पुणे-४११००१

## "सहकारी महाराष्ट्र" मासिकाचे छपाई निविदा संबंधी अटी व शर्ती

१.निविदा फॉर्म मध्ये दिलेल्या तपशीलाप्रमाणे नियतकालिकाचे दरपत्रक पाकीटात सीलबंद करुन सहकारी महाराष्ट्र नियतकालिकाचे कागदासह छपाई दरपत्रक असा उल्लेख करुन ती दिनांक --------- तारखेपासुन १५ दिवसाचे आंत या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. दिनांक ------या तारखेनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

२. आपण या कार्यालयात सादर करणार असलेल्या निविदेतील दर हे सर्व करांसहित असले पाहिजे. जर आपली निविदा कार्यालयाने स्विकारली तर निविदेत दिलेल्या दरा व्यतिरिक्त ज्यादा दराचे पेमेंट या कार्यालयाकडून केले जाणार नाही.

३.ज्यांची निविदा स्विकारली जाईल त्यांना या कार्यालयाकडे रपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र ) सुरक्षा ठेव म्हणुन बिनव्याजी रक्कम भरणा करावी लागेल. निविदा कामकाज संपल्यानंतर सदरची रक्कम परत केली जाईल.

४.निविदा मंजुर झाल्यापासून पुढील वर्षभर कार्यालयाचे गरजेनुसार आपणास निविदेत नमुद केलेल्या दरा प्रमाणे कागदाचा पुरवठा करणे व सहकारी महाराष्ट्र मासिकाची छपाई करुन निविदेत नमुद केल्या प्रमाणे सर्व कामे करावी लागतील.

५.ज्याची निविदा स्विकारली जाईल त्या पुरवठा दराने मासिकाची बिनचुक प्रुफ रिडींग करुन अंकाची डमी प्रत या कार्यालयास दाखवुन कार्यालयाची मान्यता घेवुन अंकाची छपाई करावी लागेल.

६.छपाई मजकुर दिल्या पासून अंकाचे पोस्टींग करावयाच्या तारखेपुर्वी ५ दिवस अगोदर अंकाचे प्रती तयार केलेल्या असल्या पाहिजेत.

७. छपाई केलेल्या अंकाचे जिल्हानिहाय,तालुकानिहाय विभागणी करणे व स्वखर्चाने पोस्टात ठरलेल्या तारखेला पोहोच करणे. ही सर्व कामे जबाबदारीपुर्वक करावी लागतील. सदर बाबींत जर काही प्रश्न अगर समस्या निर्माण झाल्यास पुरवठादारावर त्याची जबाबदारी निश्चित केली जाईल.

८.अंक पोस्टींग करण्यासाठी पोस्टाचा होणारा खर्च संघामार्फत करण्यांत येईल.

९.निविदेसोबत आपण कार्यालयास पुरविणार असलेल्या कागदांचे नमुने सादर केले पाहिजेत.

१०.या कार्यालयामार्फत प्रकाशित होणा-या अंकाचा नमुना कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

११.निविदा मंजुर झाल्यानंतर नमुन्यादाखल अंकाची छपाई करुन नमुना अंक पहावयास दिला पाहिजे.

१२.या कार्यालयास प्राप्त झालेली दरपत्रके (निविदा) मान्य वा अमान्य करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यालयाने स्वतःकडे राखुन ठेवला आहे.

१३.आपली निविदा नामंजुर झाल्यास अनामत रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी पाच हजार मात्र) आपणांस परत केली जाईल.

१४.निविदासाठी असलेले दोन स्वतंत्र फॉर्म दोन वेगवेगळया पाकिटात घालून सिलबंद करुन द्यावेत. पाकिटावर फॉर्म क्र. १ व फॉर्म क्र. २ असे नमुद करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी